मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२

www.newsexpressmarathi.in » पुणे, पिंपरी-चिंचवड » बुधवार, दिनांक १३ सप्टेंबर २०२३। पान १

# पिंपरी-चिंचवडमध्ये महाराष्ट्रातील सर्वात मोठा शिव महापुराण कथा सोहळा

## भाजपा शहराध्यक्ष शंकर जगताप यांची माहिती

**भोसरी।**
**न्यूज एक्सप्रेस मराठी ।**

मानवी जीवनात ज्ञान, मोक्ष, त्याग, उपवास, तप आणि जप याचे महत्त्व अधोरेखित करणारी तसेच शिव-शक्ती आणि शिव- महिमा याची प्रचिती देणारे शिव चरित्र पिंपरी-चिंचवडसह पुणे जिल्ह्यातील भाविक-भक्तांना श्रवण करता यावे. यासाठी श्री अष्टविनायक शिव महापुराण कथा भक्ती सोहळ्याचे आयोजन केले आहे, अशी माहिती भाजपा शहराध्यक्ष शंकर जगताप यांनी दिली.लोकनेते लक्ष्मणभाऊ जगताप मित्र परिवार, निर्माल्य फाउंडेशन यांच्या वतीने श्री अष्टविनायक शिवमहापुराण कथेचे आयोजन दि.१५ ते २१ सप्टेंबर २०२३ दरम्यान दुपारी २ ते ५ या वेळेत पीडब्ल्यूडी मैदान, नवी सांगवी येथे केले आहे. परमपूज्य पंडित प्रदीप मिश्रा यांच्या सुश्राव्य वाणीतून हा अभूतपूर्व अध्यात्मिक सोहळा रंगणार आहे. हा महाराष्ट्रातील सर्वात मोठा शिव पुराण कथा वाचन सोहळा आहे. शंकर जगताप म्हणाले की, मध्यप्रदेश येथील प. पु. पंडित प्रदीप मिश्रा यांच्या अमोघ वाणीतून ही कथा ऐकण्याची संधी पिंपरी-चिंचवडवासीयांना मिळणार आहे. पंडित मिश्रा यांचे हजारो अनुयायी कथेचे श्रवण करण्यासाठी येणार आहेत. या दिवसांमध्ये सुमारे आठ ते नऊ लाख श्रोते या कथेचे श्रवण करतील. त्या दृष्टीने नियोजन करण्यात आले आहे. आलेल्या भाविकांसाठी प्रशस्त व्यवस्था केली आहे. पार्किंग, सुसज्ज बैठक व्यवस्था, स्वच्छतागृह, रुग्णवाहिका, प्रथमोपचार सुविधा, जेवन, नाष्टा, शुद्ध पिण्याचे पाणी, अग्निशमन यंत्रणा, स्वच्छता नियोजन, सुरक्षा, पोलीस बंदोबस्त, भाविकांची निवास व्यवस्था, आपतकालीन व्यवस्था अशी जय्यत तयारी केली आहे. महाराष्ट्रातील कानाकोपऱ्यातून शिवभक्त या कथा वाचन सोहळ्याला उपस्थित राहणार आहेत.

भाविकांची संभाव्य गर्दी लक्षात घेता भव्य मंडप व संपूर्ण कार्यक्रमाचे नियोजन करण्यासाठी श्री शिव महापुराण कथा आयोजन समिती गठीत केली आहे.



### पंडित प्रदीप मिश्रा यांच्याबाबत माहिती

» प. पु. पंडित प्रदीप मिश्रा हे मध्यप्रदेश सिहोर येथील आहेत. त्यांचा जन्म १९८० मध्ये झाला असून, त्यांची आंतरराष्ट्रीय ख्यातीचे कथा वाचक म्हणून अध्यात्मिक क्षेत्रात ओळख आहे. भगवान महादेवाची शिव महापुराण कथा लोकांपर्यंत पोहोचवावी आणि त्यातून लोकांना चांगल्या मार्गावर जगण्याची प्रेरणा मिळावी, या उद्दात्त हेतूने कार्य करीत आहेत. त्यांचे लाखो अनुयायी आहेत. 'आस्था' या अध्यात्मिक वाहिनीवर त्यांच्या कार्यक्रमाचे लाईव्ह प्रक्षेपण होते. शिव पुराण कथेसोबतच मानवी जीवनात येणाऱ्या समस्यांवर मार्गही ते सांगतात. त्यामुळे त्यांच्या कथा वाचन कार्यक्रमांना मोठी गर्दी होते. विशेष म्हणजे, सनातन धर्माबाबत प्रचंड अभिमान असलेले अध्यात्मिक गुरू म्हणून त्यांचा उल्लेख केला जातो.

# ज्ञानेश्वर क्रीडा संकुलातील ट्रॅक अभावी खेळाडूंमध्ये निराशा!

## सराव करता येत नसल्याने त्यांच्या खेळावर परिणाम

**भोसरी ।**
**न्यूज एक्सप्रेस मराठी।**

येथील इंद्रायणीनगरातील संत ज्ञानेश्वर क्रीडा संकुलातील पिंपरी-चिंचवड महापालिकेतील एकमेव असलेला इपीडीएम पीयूस्रे ट्रॅक गेल्या सात महिन्यांपासून बंद आहे. त्यामुळे ॲथलेटीक खेळाडूंना सराव करता येत नसल्याने त्यांच्या खेळावर परिणाम होत आहे. जिल्हास्तरावर झालेल्या ॲथलेटीक स्पर्धेतही पिंपरी-चिंचवड शहरातील खेळाडू मागे पडल्याचे प्रशिक्षकांचे म्हणणे आहे. त्यामुळे येथील ट्रॅक तातडीने उभारण्याची मागणी खेळाडूंमधून होत आहे. संत ज्ञानेश्वर क्रीडा संकुलातील इपीडीएम पीयूस्रे ट्रॅकची दुरवस्था झाल्याने मार्च महिन्यात हा ट्रॅक बदलण्याचे काम महापालिकेद्वारे हाती घेण्यात आले. कामासाठी काही भागातील ट्रॅक खोदण्यात आला. मात्र अद्यापही या ट्रॅकचे काम पूर्ण होऊ शकले नाही. या क्रीडा संकुलात ॲथलेटिकच्या पंचवीस खेळ प्रकाराचा सराव खेळाडू करतात. मात्र महापालिका परिसरात अशा प्रकारचा हा एकमेव ट्रॅक असल्याने शहरातील ॲथलेटिक खेळाडू सरावाला मुकले आहेत. त्यातच ३० सप्टेंबर आणि १ ते ३ आक्टोबरला पिंपरी-चिंचवड शहर परिसरातील शालेय क्रीडा स्पर्धा महापालिकेला बालेवाडी स्टेडिअममध्ये घ्यावी लागणार आहे. या स्पर्धेत अडीच ते तीन हजार सहभागी होणाऱ्या खेळाडूंचीही गैरसोय होणार असल्याचे महापालिकेच्या क्रीडा विभागाने सांगितले आहे. त्याचप्रमाणे या स्पर्धेतील सहभागी खेळाडूंना ट्रॅकच उपलब्ध नसल्याने त्यांची सराव करण्यासाठीची अडचण निर्माण झाली आहे. काही खेळाडू बालेवाडीतील ट्रॅकवर सराव करत आहेत. मात्र सर्वच खेळाडूंना आर्थिक आणि वेळेअभावी बालेवाडीत सराव करण्याच्या अडचणी येत आहेत. राष्ट्रीय ॲथलेटीक खेळाडू मधुरा खांबे हिने सांगितले, की गेल्या वर्षी झालेल्या ॲथलेटीक स्पर्धेत चार राष्ट्रीय स्पर्धेमध्ये सहभाग नोंदवता आला. मात्र या वर्षी ट्रॅकअभावी पुरेसा सराव झाला नसल्याने जिल्हा स्तरावरील निवडीत दुसऱ्या स्थानावर समाधान मानावे लागले.तर ॲथलेटीक खेळाडू अनमोल तपशाळकर याने सांगितले, की इंद्रायणीनगरातील ट्रॅक बंद झाल्यावर मोकळ्या मैदानावर धावण्याचा सराव केला. पावसामुळे मातीच्या मैदानावर धावण्याचा सराव करताना त्रास झाला. सरावाअभावी बालेवाडीतील ट्रॅकवर धावताना दुखापत झाल्याने सप्टेंबर महिन्यातील जिल्हास्तर स्पर्धेस मुकावे लागले.



# चापेकर स्मारक देशवासीयांसाठी प्रेरणास्थळ!

## स्मारकामुळे नव्या पिढीला चापेकरांचा इतिहास माहिती होईल : राज्यपाल

**चिखली । न्यूज एक्सप्रेस मराठी।** क्रांतिवीर चापेकर बंधुंचे स्मारक हे भारताच्या स्वातंत्र्यलढ्यातील क्रांतिकारकांचे असून देशासाठी भुषणास्पद आहे. क्रांतीवीर चापेकर स्मारक समिती आणि पिंपरी-चिंचवड महापालिकेने पुनर्निमाण करुन स्मारक देशासाठी प्रेरणास्थळ बनविले आहे. स्मारकामुळे नव्या पिढीला चापेकरांचे कार्य, इतिहास माहिती होईल, असे मत राज्यपाल रमेश बैस यांनी व्यक्त केले. चापेकर स्मारक समिती संचलित पुनरुत्थान समरसता गुरुकुलम् चे भटक्या-विमुक्तांच्या सशक्तीकरणासाठीचे कार्य कौतुकास्पद असल्याचे गौरद्गारही त्यांनी काढले. क्रांतिवीर चापेकर स्मारक समितीच्या सुवर्ण महोत्सवाचा सांगता समारंभ राज्यपाल बैस यांच्या उपस्थित मंगळवारी पार पडला. समितीचे अध्यक्ष, पद्मश्री गिरीश प्रभुणे, विश्वस्त मिलींद देशपांडे, कार्यवाह ॲड सतिश गोरडे, आमदार महेश लांडगे, उमा खापरे, अश्विनी जगताप, महापालिका आयुक्त शेखर सिंह, सह धर्मादाय आयुक्त सुधीरकुमार बुके, भाजप शहराध्यक्ष शंकर जगताप, कोषाध्यक्ष रवी नामदे, निता मोहिते, शकुंतला बन्सल, अशोक पारखी, नितीन बारणे, सुहास पोफळे, आसाराम कसबे, राहुल बनगोंडे आदी उपस्थित होते. राज्यपाल बैस यांनी चापेकर वाड्याला भेट दिली. वाड्याची माहिती घेतली. त्यानंतर पुनरुत्थान समरसता गुरुकुलम् ला भेट दिली. गुरुकुलममधील विद्यार्थ्यांशी आपुलकीने संवाद साधला.



राज्यपाल बैस म्हणाले, पुनरुत्थान समरसता गुरुकुलम् मध्ये पारधी समाजीतल ३५० विद्यार्थ्यांची देखभाल केली जात आहे. शिक्षण, महिला सशक्तीकरण, भटक्या-विमुक्त जातीच्या विकासासाठी समिती काम करत आहे. पारधी, वडार, कैकाडी, गोसावी, गोंधळी, डोंबरीसह विविध जातीच्या लोकांच्या सशक्तीकरणासाठी कार्य केले जात आहे. आदिवासी समाजाचे लोक इंग्रजांना आव्हान देणारे पहिले स्वातंत्र्य सेनानी आहेत. आदिवासी, भटक्या जाती जमातीतील लोकांना शिक्षित करण्यासाठी आवश्यक कौशल्य प्रधान करण्याची गरज आहे. एकीकडे चांद्रयान मिशन यशस्वीपणे पूर्ण केले आहे. सौर मिशनही लॉंच केले आहे. दुसरीकडे कमकुवत समाजातील लोक अन्यायाने पिडीत आहेत. सन्मानासाठी झुंजत आहेत. पुनरुत्थान गुरुकुलमध्ये विद्यार्थ्यांना संगणक, मूर्ती कला, कौशल्यावर आधारित शिक्षण दिले जात आहे. कुशल मनुष्यबळाची मागणी पूर्ण करण्यासाठी जगातील विविध देश भारताकडे आक्षेने बघत आहेत. त्यासाठी विद्यार्थ्यांना रोजगापूरक शिक्षण, सर्वोतम, भाषा कौशल्य दिले पाहिजे. युवकांना उद्योजक बनण्यासाठी प्रेरित केले पाहिजे. तरच युवक आत्मनिर्भर बनतील. त्यांच्या कुटुबियांचा जीवनस्तर उंचावेल, असेही राज्यपाल बैस म्हणाले.

### राजभवनाचे दरवाजे खुले

» क्रांतिवीर चापेकर स्मारक समितीचे कार्य वाखणण्याजोगे आहे. समितीसाठी राजभवनाचे दरवाजे सातत्याने खुले आहेत. समितीसाठी कोणतीही मदत करु शकल्यास मला सर्वाधिक आनंद होईल, असेही राज्यपाल बैस म्हणाले. प्रास्तविक करताना गिरीश प्रभुणे म्हणाले, पारधी समाजातील मुले शिक्षण घेत आहेत. मुलांना वैद्यकीय शिक्षण, ग्रामविकासाचे कौशल्यावर आधारित शिक्षण दिले जाते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.दिंगबर ढोकले यांनी केले. तर, ॲड सतिश गोरडे यांनी आभार मानले.

# बनावट स्क्रीन शॉटद्वारे ४०० जणांना फसवले!

## पिंपरी-चिंचवडच्या बंटी-बबलीस युनिट ४ च्या पथकाकडून अटक

**पिंपरी-चिंचवड। न्यूज एक्सप्रेस मराठी।** खरेदी केल्यानंतर यूपीआयद्वारे पेमेंट केल्याचा बनावट स्क्रीन शॉट दाखवून चारशे जणांना गंडा घालणाऱ्या बंटी-बबलीला पोलिसांनी सापळा रचून अटक केली. गुन्हे शाखा युनिट ४ च्या पथकाने ही कामगिरी केली. गणेश शंकर बोरसे (३४), प्रिया गणेश बोरसे (२८. दोघे रा. काकडे यांची रुम, पठारे वस्ती, लोहगाव, पुणे) अशी अटक केलेल्या आरोपींची नावे आहेत. वरिष्ठ निरीक्षक शंकर अवताडे यांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी दिलीपकुमार माली (रा. रहाटणी) यांनी तक्रार दिली होती की, एका दांपत्याने त्यांच्या कपड्याच्या दुकानात खरेदी केली. त्यानंतर ऑनलाईन पेमेंट करतो, असे सांगून खोटा स्क्रीन शॉट दाखवत त्यांची फसवणूक केली. या गुन्ह्याचा तपास करीत असताना पोलिस शिपाई प्रशांत सैद यांनी तांत्रिक विश्लेषण करून आरोपीची ओळख पटवली.




मात्र, आरोपी हुशार होता. व्यावसायिकांना फसवल्यानंतर आरोपी मोबाईल स्विच ऑफ करीत असल्याने पोलिसांना अडचणी येत होत्या. तसेच, प्रत्येक वेळी आरोपी नवीन मोबाईल क्रमांकाचा वापर करीत होता. तो राहण्याचे ठिकाणही बदलत होता. दरम्यान, आरोपी रहाटणी, वाकड परिसरात फिरत असल्याची माहिती युनिट ४ च्या पथकाला मिळाली. त्यानुसार, सापळा रचून आरोपीला ताब्यात घेतले. चौकशीत आरोपींनी अनेकांना गंडा घातल्याची कबुली दिली. ही कामगिरी उपायुक्त स्वप्ना गोरे, सहा.पोलीस आयुक्त सतीश माने, यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक शंकर आवताडे, सहायक पोलीस निरीक्षक सिद्धनाथ बाबर, उपनिरीक्षक गणेश रायकर, नारायण जाधव, संजय गवारे, दादा पवार, अदिनाथ मिसाळ, आबासाहेब किरनाळे, प्रवीण दळे, तुषार शेटे, मोहम्मद नदाफ, रोहिदास आडे, वासुदेव मुडे, सुनील गुट्टे, सुरेश जायभाये, प्रशांत सैद यांनी केली. आरोपी दुकानदाराशी गोड बोलून त्यांचा विश्वास संपादन करीत होते. त्यानंतर जीवनावश्यक, मौजमजेच्या वस्तूंची खरेदी करायचे. खरेदीनंतर ऑनलाईन पेमेंट केल्याचे सांगून एकरा बॅंकेच्या बनावट ॲपचे स्क्रिन शॉट दुकानदाराला दाखवले जायचे. पेमेंट आले नसल्याने दुकानदाराने आरोपींना थांबवल्यास २४ तासांच्या आत पेमेंट येते, पेमेंट न आल्यास मला फोन करा, असे सांगून आरोपी स्वतःचा मोबाईल क्रमांक दुकानदारांना द्यायचे. आरोपी दुकानाबाहेर पडले की, लगेच दुकानदाराचा मोबाईल नंबर ब्लॉक लिस्ट केला जायचा व आरोपी मोबाईलमधून सिमकार्ड काढून नवीन नंबरचे सिमकार्ड घेत होते. आरोपी गणेश हा हुशार आहे. पोलिसांकडून पकडले जाऊ नये, यासाठी त्याने पत्नीला मोबाईल वापरण्यास दिला नाही. तसेच, मोबाईलवरून एकही कॉल केला नाही. आरोपींनी पाणीपुरी, किराणा, मेडिकल, केक, मसाले, हार, गादी, सायकल, लॅपटॉप, इलेक्ट्रीक वस्तू, स्टेशनरी, गिफ्ट हाऊस, नर्सरी, अशा प्रकारचा व्यवसाय करणाऱ्या ४०० जणांना फसवल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे.

### अशी करायचे फसवणूक..

» आरोपी दुकानदाराशी गोड बोलून त्यांचा विश्वास संपादन करीत होते. त्यानंतर जीवनावश्यक, मौजमजेच्या वस्तूंची खरेदी करायचे. खरेदीनंतर ऑनलाईन पेमेंट केल्याचे सांगून एकरा बॅंकेच्या बनावट ॲपचे स्क्रिन शॉट दुकानदाराला दाखवले जायचे. पेमेंट आले नसल्याने दुकानदाराने आरोपींना थांबवल्यास २४ तासांच्या आत पेमेंट येते, पेमेंट न आल्यास मला फोन करा, असे सांगून आरोपी स्वतःचा मोबाईल क्रमांक दुकानदारांना द्यायचे. आरोपी दुकानाबाहेर पडले की, लगेच दुकानदाराचा मोबाईल नंबर ब्लॉक लिस्ट केला जायचा व आरोपी मोबाईलमधून सिमकार्ड काढून नवीन नंबरचे सिमकार्ड घेत होते.

# साडे सहाशे कोटीच्या पाणीपट्टीस विरोध!

## ६६७ कोटींची बिल पाठविल्याने पालिका प्रशासनाचे धाबे दणाणले

**पुणे। न्यूज एक्सप्रेस मराठी।** पाटबंधारे विभागाने शहरातील व्यावसायिक पाणी वापरास औद्योगीक पाणी वापराचा दर लावला आहे. तसेच सांडपाणी प्रक्रियेबाबत कालबद्ध कार्यक्रम यापूर्वीच सादर केला आहे. तरीही पाटबंधारे विभागाने महापालिकेला थकबाकीसह ६६७ कोटींची बिल पाठविल्याने पालिका प्रशासनाचे धाबे दणाणले आहेत. हे बिल महापालिकेने अमान्य केले असून, केवळ भामा आसखेड धरणातील पाणी वापरापोटी ११ कोटीची रक्कम थकीत असल्याचा दावा केला आहे. यावर तोडगा काढण्यासाठी महापालिका आणि पाटबंधारे विभागाच्या कार्यकारी संचालक यांच्यामध्ये बैठक होणार आहे. पुणे शहराला २० टीएमसी पाणी मिळावे अशी मागणी महापालिकेची असली तरी अद्याप हा कोटा मंजूर केलेला नाही. त्यातच महापालिकेत ३४ गावे समाविष्ट झाल्याने पाणी वापर वाढला आहे. एकीकडे वाढीव पाण्याचा कोटा मंजूर होत नसताना दुसरीकडे पाटबंधारे विभागाने महापालिकेला ६६७ कोटी रुपयांचे पाण्याचे बिल पाठविले आहे. पुणे शहरात निवासी, व्यावसायिक व औद्योगीक पाणी वापर होतो. महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणातर्फे २०११, २०१८ मध्ये पाण्याचे दर निश्चित केले केले. त्यामध्ये निवासी आणि औद्योगीक असे दोनच प्रकार ठेवले. त्यामुळे निवासी पाणी वापराव्यतरिक्त इतर सर्व प्रकारचा पाणी वापर औद्योगीक असल्याचे



गृहीत धरले. त्यामुळे तब्बल २० पट पाणीपट्टी लावण्यात आली आहे. २०२२ मध्ये महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाने नवे दर निश्चित केल्यानंतर महापालिकेने पाटबंधारे विभागाकडून निवासी, व्यावसायिक आणि औद्योगीक असे तीन गट तयार करून त्यानुसार महापालिकेला पाणी पट्टी लावली आहे. महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाने निवासी पाणी वापरासाठी ५५ पैसे प्रति किलो लिटर (एक हजार लिटर) व्यावसायिक राणी वापरासाठी २.७५ रुपये प्रति किलो लिटर आणि औद्योगीक पाणी वापरासाठी ११ रुपये प्रति किलो लिटर असा दर निश्चित केला आहे. २०११ ते २०२१ या १० वर्षात पाटबंधारे विभागाने व्यावसायिक पाणी वापराला औद्योगीक दर लावून बिल पाठविले आहे. त्यामुळे ३३३ कोटी

### पूर्व सूचना दिल्याने दंड माफ करा

**» मुळामुठा नदीत सांडपाणी सोडले जात असल्याने त्यामुळे पाटबंधारे विभागाने महापालिकेला ३३४ कोटी रुपयांचा दंड ठोठावला आहे. पण महापालिकेने नियमानुसार दोन वर्ष आधीच जल प्रदूषण रोखण्यासाठी काय केले जाणार आहे याचा कालबद्ध कार्यक्रम प्राधिकरणाला सादर केला आहे. त्यामुळे हा दंड महापालिकेला लावता येणार नाही. हा दंड रद्द करावी अशी भूमिका घेतली आहे. त्याबाबत यापूर्वी पत्रव्यवहार ही केला आहे.**

**“ पाटबंधारे विभागाने महापालिकेला ६६७ कोटी रुपयांचे पाण्याचे बिल पाठवले आहे. पण हे बिल योग्य नसल्याने यामध्ये सुधारणा होणे आवश्यक आहे. यासाठी पाटबंधारे विभागाच्या कार्यकारी संचालकांच्या बैठकीत यावर चर्चा केली जाईल.'**

**- अनिरुद्ध पावसकर,**
**प्रमुख, पाणी पुरवठा विभाग**

रुपये थकबाकी दाखविली आहे. महापालिकेने औद्योगीक दराने पाणी आकारणीस विरोध करत व्यावसायिक दराने पाणी पट्टी घेतली पाहिजे. पुणे शहरात औद्योगीक क्षेत्र खूप कमी आहे, त्यामुळे हा दर सरसकट लावण्यास विरोध केला आहे.

# पुणे पोलिसाचा कुंटणखान्यावर छापा!

## पाच बांगलादेशी महिलांसह ७ जणांना पोलिसांनी पकडले

**पुणे । न्यूज एक्सप्रेस मराठी।** पुणे शहरातील बुधवार पेठेत बेकायदा वास्तव्य करणाऱ्या पाच बांगलादेशी महिलांसह सात जणांना गुन्हे शाखेच्या सामाजिक सुरक्षा विभागाने पकडले. पोलिसांच्या पथकाने एका कुंटणखान्यावर छापा टाकून अल्पवयीन बांगलादेशी मुलीला ताब्यात घेतले. आठवडाभरापूर्वी पोलिसांनी बुधवार पेठेतील वेश्यावस्तीतून बांगलादेशी महिलांसह १९ जणांना पकडले होते. बुधवार पेठेतील वेश्यावस्तीत बांगलादेशी महिला, त्यांचे साथीदार बेकायदा वास्तव्य करत असल्याची माहिती गुन्हे शाखेच्या सामाजिक सुरक्षा विभागाला मिळाली होती. पोलिसांच्या पथकाने छापा टाकून पाच बांगलादेशी महिलांसह सात जणांना ताब्यात घेतले. चौकशीत



एका कुंटणखान्यात बांगलादेशी अल्पवयीन मुलीकडून वेश्याव्यवसाय करुन घेतला जात असल्याची माहिती मिळाली. पोलिसांच्या पथकाने अल्पवयीन मुलीची कुंटणखान्यनातून सुटका केली. बांगलादेशी महिला आणि नागिरकांकडे चौकशी करण्यात आली. तेव्हा त्यांच्याकडे वास्तव्याची कोणतीही कागदपत्रे नसल्याचे उघडकीस आले. ताब्यात घेण्यात आलेल्या ५ बांगलादेशी महिला या वेश्या व्यवसाय करत होत्या. तर त्यांच्या सोबत असणारे पुरुष हे वेगवेगळे व्यवसाय करत होते. बेकायदा वास्तव्य केल्याप्रकरणी सात बांगलादेशी नागरिकांविरुद्ध पोलिसांनी पारपत्र अधिनियम, तसेच परकीय नागरिक आदेश कायद्यातील कलमांन्वये फरासखाना पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल केला. अल्पवयीन मुलीला वेश्याव्यवसायास प्रवृत्त केल्याप्रकरणी तीन दलालांविरुद्ध बाल लैंगिक अत्याचार प्रतिबंधक कायद्यान्वये (पोक्सो) स्वतंत्र गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिस आयुक्त रितेश कुमार, सहआयुक्त संदीप कर्णिक, अतिरिक्त आयुक्त रामनाथ पोकळे, उपायुक्त अमोल झेंडे यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलिस निरीक्षक भरत जाधव, सहायक निरीक्षक अश्विनी पाटील, अनिकेत पोटे, राजेश माळगावे, राजेंद्र कुमावत, बाबासाहेब कर्पे, अजय राणे, तुषार भिवरकर, मनीषा पुकाळे, अमेय रसाळ, सागर केकाण आदींनी ही कारवाई केली.

### वेश्याव्यवसायातून मुलीची सुटका

**» बुधवार पेठेतील वेश्यावस्तीत बांगलादेशी महिला, त्यांचे साथीदार बेकायदा वास्तव्य करत असल्याची माहिती गुन्हे शाखेच्या सामाजिक सुरक्षा विभागाला मिळाली होती. पोलिसांच्या पथकाने छापा टाकून पाच बांगलादेशी महिलांसह सात जणांना ताब्यात घेतले. चौकशीत एका कुंटणखान्यात बांगलादेशी अल्पवयीन मुलीकडून वेश्याव्यवसाय करुन घेतला जात असल्याची माहिती मिळाली. पोलिसांच्या पथकाने अल्पवयीन मुलीची कुंटणखान्यनातून सुटका केली. बांगलादेशी महिला आणि नागिरकांकडे चौकशी करण्यात आली. तेव्हा त्यांच्याकडे वास्तव्याची कोणतीही कागदपत्रे नसल्याचे उघडकीस आले.**

# समाविष्ट ११ गावांचा विकास पुन्हा लांबणीवर

## मुदतवाढ देण्याच्या प्रस्तावाला आयुक्त विक्रम कुमार यांनी मंजुरी

**पुणे । न्यूज एक्सप्रेस मराठी।**

महापालिका हद्दीत समाविष्ट झालेल्या ११ गावांचा विकास आराखडा प्रसिद्ध करण्यासाठी पुन्हा मुदतवाढ देण्याच्या प्रस्तावाला आयुक्त, प्रशासक विक्रम कुमार यांनी मंजुरी दिली आहे. त्यानुसार येत्या १ मार्च २०२४ पर्यंत गावांचा विकास आराखडा करण्यास मुदत मिळाली आहे. आयुक्तांनी मंजूर केलेला प्रस्ताव पुढील कार्यवाहीसाठी राज्य शासनाच्या नगरविकास विभागाकडे पाठविण्यात आला आहे. त्यामुळे समाविष्ट गावातील विकास पुन्हा लांबणीवर पडणार आहे. विकास आराखडा जाहीर करण्याची मुदत संपुष्टात आल्याने मुदतवाढ द्यावी, असा प्रस्ताव महापालिकेने राज्य शासनाला पाठविला. राज्य शासनाने ज्या प्रस्तावाला २५ जून २०२३ पर्यंत मुदतवाढ दिली. या कालावधीतही तो पूर्ण होऊ न शकल्याने आता पुन्हा १ मार्च २०२४ पर्यंतची मुदतवाढ राज्य शासनाकडे मागण्यात आली होती. तसा प्रस्ताव शहर सुधारणा समितीपुढे ठेवण्यात आला होता. शहर सुधारणा समितीच्या मंजुरीनंतर हा प्रस्ताव आयुक्तांकडे आला होता. त्यास आयुक्तांनी मंजुरी दिली आहे. महापालिका हद्दीत ४ ऑक्टोबर २०१७ मध्ये ११ गावांचा समावेश करण्यात आला. लोहगाव आणि मुंढव्यातील उर्वरित भाग, साडेसतरानळी, उत्तमनगर, शिवणे, आंबेगाव खुर्द, उंड्री, धायरी, आंबेगाव बुद्रूक, फुरसुंगी आणि उरुळी देवाची ही गावे पुणे महापालिकेमध्ये समाविष्ट झाली. त्यानंतर जवळपास एक वर्षाने म्हणजे ४ डिसेंबर २०१८ रोजी या गावांचा विकास आराखडा महापालिकेने प्रसिद्ध केला होता. त्याला २१ डिसेंबर २०१८ रोजी महापालिकेच्या मुख्य सभेने मान्यता दिली. मात्र, सन २०१९ मधील लोकसभा, विधानसभा तसेच वाढीव हद्दीतील पोटनिवडणुकीमुळे विकास आराखडा प्रसिद्ध करण्यास विलंब झाला. त्यानंतर २०२० पासून कोरोना संसर्ग सुरू झाल्याने प्रारूप विकास आराखड्याचे काम ठप्प झाले. कोरोना संसर्ग नियंत्रणात आल्यानंतर आरक्षण निश्चिती, जमीन वापराचे नकाशे आणि त्याचा अहवाल करण्याचे काम पूर्ण करण्यात आले. या गावांमध्ये अद्यापही प्रादेशिक आराखडाच लागू आहेत. राज्यात सर्वत्र एकात्मिक बांधकाम नियंत्रण नियमावलीची अंमलबजावणी होत असताना या गावांमध्ये त्याची अंमलबजावणी होत नसल्याने विकासाला त्याचा फटका बसत आहे. हस्तांतरण विकास हक्क (टीडीआर) वापरून बांधकाम करण्यासही मर्यादा येत आहेत. आता पुन्हा मुदतवाढीचा प्रस्ताव सादर करण्यात आल्याने ११ गावांतील विकासही लांबणीवर पडणार असल्याचे स्पष्ट झाले आहे.



### आयुक्तांनी दिली मंजुरी

» राज्य शासनाने ज्या प्रस्तावाला २५ जून २०२३ पर्यंत मुदतवाढ दिली. या कालावधीतही तो पूर्ण होऊ न शकल्याने आता पुन्हा १ मार्च २०२४ पर्यंतची मुदतवाढ राज्य शासनाकडे मागण्यात आली होती. तसा प्रस्ताव शहर सुधारणा समितीपुढे ठेवण्यात आला होता. शहर सुधारणा समितीच्या मंजुरीनंतर हा प्रस्ताव आयुक्तांकडे आला होता. त्यास आयुक्तांनी मंजुरी दिली आहे. महापालिका हद्दीत ४ ऑक्टोबर २०१७ मध्ये ११ गावांचा समावेश करण्यात आला.

# भाजप लोकशाही संपविण्याचे काम करत आहे

## मनमानी कारभाराला जनता येत्या निवडणुकीत चोख उत्तर देईल : अरविंद शिंदे

**पुणे । न्यूज एक्सप्रेस मराठी।**

लोकशाही आणि राज्य घटना संपविण्याचे काम भाजप करीत आहे या मनमानी कारभाराला सर्वसामान्य जनता आता कंटाळली आहे. येत्या निवडणुकीत जनता या भाजपाच्या मनमानी कारभाराला चोख उत्तर दिल्या शिवाय राहणार नाही असा विश्वास काँग्रेस पुणे शहर अध्यक्ष अरविंद शिंदे यांनी व्यक्त केला. पुणे शहर जिल्हा काँग्रेस कमिटीच्या वतीने छत्रपती शिवाजीनगर विधानसभा मतदार संघात चिखलवाडी येथील बुद्ध विहारात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास अरविंद शिंदे, दीप्ती चौधरी, विनोद रणपिसे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून जनसंवाद पद यात्रेची सुरवात करण्यात आली. खडकी स्टेशन, एल आय सी रोड, औंध रोड चौक, पडाळ वस्ती, छत्रपती शिवाजी उद्यान, भीमज्योत नगर भाजी मंडई, या मार्गातून यात्रा काढण्यात आली आणि समारोप सभा डॉ. बाबासाहेब आंबेडकर बोपोडी चौकात घेऊन करण्यात आला. याप्रसंगी माजी गृहराज्यमंत्री रमेश बागवे, महा. प्रदेश सरचिटणीस अभय छाजेड, माजी महापौर कमल व्यवहारे, माजी. उपमहापौर रजनी त्रिभुवन, माजी नगरसेविका लता राजगुरू, काँग्रेस सरचिटणीस पुणे शहर विनोद रणपिसे, कैलास गायकवाड, ऍड. नंदलाल धीवार, अध्यक्ष शिवाजी नगर काँग्रेस ब्लॉक कमिटी अजित जाधव, बोपोडी काँग्रेस ब्लॉक कमिटी अध्यक्ष विशाल जाधव, राजेंद्र भुतडा, डी वाय एस पी अनिल पवार, किशोर वाघमारे, विजय कांबळे, योगेश पवार, रमा भोसले, कांता ढोणे, माया मोरे, सुंदरताई ओव्हाळ,विमल खांडेकर, अरुणा चेमटे, उषा जाधव, प्रियांका मधाळे, प्राजक्ता गायकवाड, ऍड. विठ्ठल आरुडे यांच्यासह काँग्रेस पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते.

